रजि.क्र.पी.एन.ए./बी.एन.के./२३०/७४/दि.२५.४.७४ R.B.I. LICENSE NO.ACD MH 90-P.23-12-76

# शरद सहकारी बँक लि.,मंचर

मुख्यालय :- मार्केटयार्ड, मंचर, ता.आंबेगाव,जि.पुणे. ४१० ५०३.
फोन :- (०२१३३)२२३१०३, २२५४५०, फॅक्स - २२५०७५
Email- ho@sharadbank.com

**शाखांतर्गत पत्रव्यवहार**

मुका/अकौंट/परिपत्रक/ठेव व्याज दर/ ६२७/२०२६-२७ दि.१५/०६/२०२६

प्रति,

मा. शाखा व्यवस्थापक,
शाखा:- सर्व

विषय:- ठेवीवरील सुधारीत व्याजदर.
संदर्भ:- मा.संचालक मंडळ सभा दि.२८/०५/२०२६ चा ठराव क्र.१७.

उपरोक्त विषयांकित संदर्भास अनुसरून कळविण्यात येते की,
बँकेच्या ठेवीवरील प्रचलित व्याजदरात संदर्भित ठरावान्वये बदल करण्यात आला आहे. दि.०१/०७/२०२६ पासून ठेवीवरील सुधारीत व्याजदर खालील प्रमाणे राहतील.

**दि.०१/०७/२०२६ पासून लागू**
**(या तारखेपासून नविन स्विकारलेल्या वा नूतनीकरण होणाऱ्या ठेवींना लागू)**
**ठेवीवरील नवीन सुधारित व्याजदर**

(द.सा.द.शे.)

| अ.क्र. | ठेव कालावधी | सामान्य ठेवीदार | जेष्ठ नागरिक व सेवकांकरिताच | बल्क ठेव (एकरकमी रू.१५.०० लाख व त्यापेक्षा अधिक) |
|---|---|---|---|---|
| अ. | बचत ठेव | ३.००% | ३.००% | - |
| ब. | पिग्मी ठेव | २.००% | २.००% | - |
| क. | मुदत ठेव | | | |
| १ | ७ दिवस ते ३० दिवसांपर्यंत | ४.००% | ४.२५% | ४.२५% |
| २ | ३१ दिवस ते ९० दिवस | ४.५०% | ५.००% | ५.००% |
| ३ | ९१ दिवस ते १८० दिवस | ५.७५% | ६.००% | ६.००% |
| ४ | १८१ दिवस ते ३६५ दिवस | ६.५०% | ६.७५% | ६.७५% |
| ५ | १२ महिनेचे पुढे ते १८ महिने पर्यंत | ७.२५% | ७.५०% | ७.५०% |
| ६ | १८ महिनेचे पुढे ते ३ वर्ष पर्यंत | ७.६०% | ७.८५% | ७.८५% |
| ७ | ३ वर्षेचे पुढे ते ५ वर्ष पर्यंत | ७.९०% | ८.००% | ८.००% |
| ८ | ५ वर्षेचे पुढे ते १० वर्ष पर्यंत | ८.१५% | ८.३०% | ८.३०% |

१. १२ महिनेचे पुढील कालावधीसाठीचे सुधारित ठेव व्याजदर मुदत ठेव, आवर्त ठेव व पुर्नगुंतवणूक ठेव इ.साठी लागू राहतील.

२. बचत खात्यावर दैनंदिन पध्दतीने द.सा.द.शे. ३% प्रमाणे व्याजदर लागू राहील.(पतसंस्थांची बचत खाती वगळून)

३. मासिक/त्रैमासिक ठेव व्याज संगणक प्रणालीतील देय व्याजाप्रमाणे होईल.(Discounting Rate)



(P.T.O.)

४. संस्था ठेवी व विशेष ठेव योजना वगळता इतर प्रकारातील ठेवीची मुदत संपल्यानंतर आपोआप नूतनीकरण (Auto Renewal) ची सुविधा संगणक प्रणालीमध्ये उपलब्ध आहे. मात्र त्यासाठी तशी सुचना ठेवीदाराकडून ठेव खाते फॉर्म भरून घेतानाच घेण्यात यावी. असा फॉर्म भरलेला नसल्यास आपोआप नुतनीकरण होणार नाही, याची दक्षता घ्यावी.

५. **आपोआप नूतनीकरण (Auto Renewal) सुविधा ही संस्था किंवा पतसंस्थांना लागू राहणार नाही. ही सवलत फक्त वैयक्तिक खातेदारांनाच लागू राहील. याची नोंद घ्यावी. तशी नोंद त्या पावत्यांवर शाखेने करावी. नोंद न झाल्यामुळे तक्रारी आलेस त्यास संबंधीत अधिकारी जबाबदार राहतील.**

६. ठेवीदारांची ठेवीची मुदत संपल्यानंतर पुढील १४ दिवसाचे आत नुतनीकरण केल्यास As on व्याजदर लागू राहील, १४ दिवसांनंतर ठेवीचे नुतनीकरण केल्यास ठेवीची मुदत संपल्यांनतर नुतनीकरण करेपर्यंतच्या कालावधीकरीता बचत ठेव व्याजदर म्हणजे ३% प्रमाणे व्याज द्यावे व पुढे नुतनीकरण केल्यापासूनच्या तारखेस जो व्याजदर लागू असेल त्या प्रमाणे नूतनीकरण करावे.

७. प्राप्तीकर अधिनियमातील तरतुदीनुसार आवर्त, मुदत ठेवीवरील दिलेल्या व्याज रक्कमेवर नियमाप्रमाणे टी.डी.एस. कपात होईल. परंतु जे ठेवीदार Form No.121 भरून देतील त्यांचा टी.डी.एस. कपात केला जाणार नाही. **ठेव खातेसाठी ठेवीदाराचे पॅनकार्ड आधार कार्डशी लिंक असणे अनिवार्य आहे.**

८. **ठेव खातेदाराचे पॅन कार्ड आधार कार्डशी लिंक नसेल तर प्राप्तीकर विभागाचे नियमाप्रमाणे ठेवींचे व्याजावरील रक्कमेवर २०% प्रमाणे टी.डी.एस. कपात बंधनकारक राहील.**

९. **दि.०१/०४/२०२६ पासून टी.डी.एस. कलम १०२१ नुसार आर्थिक वर्षात सर्वसामान्य ठेवीदार व सर्व सहकारी संस्थांच्या ठेवींची व्याज रक्कम रू.५०,०००/- व त्यापेक्षा अधिक असेल त्या ठेव व्याजावर १०% दराने टी.डी.एस. कपात बंधनकारक आहे.**

१०. **दि.०१/०४/२०२६ पासून टी.डी.एस. कलम १०२१ नुसार आर्थिक वर्षात जेष्ठ नागरीक ठेवीदाराच्या ठेवींची व्याज रक्कम रू.१,००,०००/- व त्यापेक्षा अधिक असेल त्या ठेव व्याजावर १०% दराने टी.डी.एस. कपात बंधनकारक आहे.**

११. वेळोवेळी ज्या विशिष्ठ ठेव योजना राबवल्या जातात त्यांच्या मुदती संपलेनंतर त्या Auto Renew होणार नाहीत. सबब यासाठी संबंधीत खातेदारांना किमान १५ दिवस आधी एस.एम.एस/पत्र द्वारे पुर्व सूचना ठेव खातेदारांना द्यावी. याबाबतची सर्व जबाबदारी संबंधित शाखेची यांची राहील.

१२. व्याजदरातील बदल ग्राहक व खातेदारांना सत्वर कळवावा. तसेच प्रसिद्धी फलकावर प्रसिद्ध करावा.

**मुख्य कार्यकारी अधिकारी**

**प्रत – १) मा.सर्व विभाग प्रमुख–** मुख्य कार्यालय.